सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

# मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम, १९५६

(३० एप्रिल १९७९ पर्यंतच्या फेरबदलांसह)

१९८१

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय

मुंबई

[किंमत १ रुपया ६० पैसे]

# मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम, १९५६

शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक ९०८७/५-दोन-डी, दिनांक २७ एप्रिल १९५६ (मुं.शा.रा., भाग चार-ब, पृ. ६६९).

शा. अ., गृ. वि., क्रमांक पीआरएस्-५४५९/१०३५६९, दिनांक २७ जानेवारी १९६० (मुं.शा.रा., भाग चार-ब, पृ. १३५) अन्वये सुधारित.

शा.अ., गृ. वि., क्रमांक बीपीए-१६५६/७३७३१-पाच, दिनांक १३ ऑक्टोबर १९६० (मुं.शा.रा., भाग चार-ब, पृ. २८४) अन्वये सुधारित.

शा. अ., गृ. वि., क्रमांक पीएआर/१०६२/३१८२५-नऊ, दिनांक ७ मार्च १९६२ (म.शा.रा., भाग चार-ब, पृ. ५११) अन्वये सुधारित.

शा. अ., गृ. वि., क्रमांक पीएआर. १०६६-नऊ, दिनांक २४ एप्रिल १९६७ (म.शा.रा., भाग चार-ब, पृ. १३२४) अन्वये सुधारित.

शा. अ., गृ. वि., क्रमांक पीडीइ. ४०५६/६२८३१-नऊ, दिनांक ८ मे १९६८ (म.शा.रा., भाग चार-ब., पृ. ४९८) अन्वये सुधारित.

शा. अ., गृ. वि., क्रमांक पीएआर. १०६२/३०५८१-नऊ, दिनांक १८ जून १९७० (म.शा.रा., भाग चार-ब, पृ. ९५७) अन्वये सुधारित.

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २२) याचे कलम २५, पोट-कलम (२), खंड (क) आणि कलम ५ (ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मुंबई शासन, मुंबई राज्याच्या पोलीस निरीक्षकांना व त्यापेक्षा कमी दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांना करावयाच्या शिक्षा आणि त्या विरुद्धची अपिले यांचे विनियमन करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे :—

★ १. (१) ह्या नियमांना मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम, १९५६ असे म्हणता येईल.

(१-अ) ते संपूर्ण मुंबई राज्यास लागू असतील.

(२) ते, ज्यांचा दर्जा पोलीस निरीक्षकांएवढा आणि त्यापेक्षा कमी असेल अशा [1](रेल्वे पोलीस अधिकाऱ्यांसह) मुंबई राज्याच्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना (यापुढे त्याचा निर्देश पोलीस अधिकारी असा केला आहे) लागू होतील.

★ २. ज्या पोलीस अधिकाऱ्यांना हे नियम लागू आहेत, अशा पोलीस अधिकाऱ्यांना ह्या नियमाखेरीज इतर कोणत्याही प्रकारे विभागामार्फत शिक्षा केली जाणार नाही.

१. शा.अ., १३ ऑक्टोबर १९६० अन्वये समाविष्ट.